जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४१६ दिनांक - ०८/०६/२०२३**

स्वारगेट पोलिस स्टेशन पुणे शहर

## स्वारगेट एसटी स्टॅन्ड परिसरामध्ये गर्दीचा फायदा घेवुन मोबाईल चोरी करणा-या चोरटयास केले जेरबंद

स्वारगेट पोलीस ठाणे पुणे शहर गु.र.नं.१५३/२०२३ भा.दं.वि. ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असुन दाखल गुन्हयातील फिर्यादी हे दि.०५/०६/२०२३ रोजी १५/०० वा सुमारास स्वारगेट एसटी स्टॅन्ड येथे श्रीगोंदा बस मध्ये चढत असताना गर्दी मध्ये कोणीतरी त्यांचा मोबाईल खिशातुन काढुन घेवुन पळुन जात असल्याचे त्यांचे नातेवाईक यांनी पाहिले त्यानंतर सदर ठिकाणी आरडाओरडा झाला असता स्वारगेट एसटी स्टॅन्ड येथे पेट्रोलिंग करणारे स्वारगेट पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील अंमलदार यांनी सदर इसमास पकडुन त्यास पोलीस स्टेशन येथे घेवुन येवुन त्याला त्याचा नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव अंकुश अशोक कराड वय ३९ वर्षे रा.मु.पो येली ता.पाथर्डी जि.अहमदनगर असे सांगितले त्या नंतर त्याची झडती घेतली असता त्याचे कडे वर नमुद दाखल गुन्हयातील मोबाईल मिळुन आला.

सदर आरोपीस दाखल गुन्हयात अटक करुन त्याचे कडे अधिक तपास केला असता त्याचे कडे वेगवेगळया कंपनीचे एकुण ६० हजार रुपये किंमतीचे एकुण १२ मोबाईल मिळुन आले असुन सदर मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.दाखल गुन्हयाचा तपास मुकुंद तारु पोलीस हवालदार स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर.श्री.प्रविणकुमार पाटील,मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-२,पुणे शहर.श्री.स्मार्तना पाटील,मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे शहर श्री.नारायण शिरगावकर,यांचे मार्गदर्शनाखाली स्वारगेट पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक इंदलकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सोमनाथ जाधव,यांच्या आदेशान्वये तपास पथकातील सहा.पोलीस निरीक्षक प्रशांत संदे,पोलीस उप निरीक्षक अशोक येवले,व पो.हवा मुकुंद तारु, शिवा गायकवाड,फिरोज शेख,रमेश चव्हाण,संदीप घुले,अनिस शेख,दिपक खेंदाड,सुजय पवार,प्रविण गोडसे, यांनी एकत्र मिळुन केली आहे.


पुणे शहर वरिष्ठ पोलीस
अधिकारी व
स्वारगेट पोलीस स्टेशन
अधिकारी
पोलीस आयुक्तालय पुणे शहर
स्वारगेट पोलीस स्टेशन